# कॅन्टोन्मेंट बोर्ड देहूरोड

# प्रसिध्दीकरिता

# कोरोना व्हायरस बाबत

आज दिनांक ११/०३/२०२० रोजी सोशल मिडीया व न्यूज चॅनल वर देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्ड हददीमध्ये कोरोना व्हायरसचा संशयित रूग्ण आढळलेबाबत बातमी प्रसारीत करण्यात आली होती. कोरोना बाधित कोणीही रूग्ण कॅन्टोन्मेंट जनरल हॉस्पीटल मध्ये दाखल झालेला नसून सदर प्रसारित करण्यात आलेली बातमी चुकीची व दिशाभूल करणारी आहे, अशाप्रकारे चुकीची बातमी देवून नागरीकांमध्ये घबराट निर्माण करणा-या विरूध्द प्रशासनामार्फत कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले. तसेच सरकारी आदेशानुसार परदेशातून येणा-या व्यक्तीनी कोरोना व्हायरस आजाराविषयी तपासणी करणे आवश्यक आहे याचा अर्थ तो रूग्ण कोरोना बाधित किंवा संशयित होवू शकत नाही. तरीही सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की अफवावर विश्वास ठेवू नये व सर्वानी योग्य ती काळजी घ्यावी.

याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी श्री रामस्वरूप हरितवाल यांनी देहूरोड हददीतील सर्व डॉक्टरांची तातडीची बैठक आयोजित केली, त्याचप्रमाणे आरोग्य विभाग, हॉस्पीटल अधिकारी व कर्मचारी यांनाही याबाबत सतर्क राहण्याच्या सुचना बैठकीत देण्यात आल्या आहेत.

तसेच कॅन्टोन्मेंट बोर्डातर्फे सातही वॉर्डामध्ये कोरोना व्हायरस विषयी जागृकता करण्याविषयी संबंधिताना आदेश देण्यात आले.

सदर बैठकीस कॅन्टोन्मेंट बोर्डाचे उपाध्यक्ष श्री रघुवीर शेलार, सदस्य सौ, सारिकाताई नाईकनवरे, श्री विशाल खंडेलवाल, श्री ललित बालघरे , सौ अरूणाताई पिंजण तसेच कार्यालय अधिक्षक, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते. कोरोना आजारा व रूग्णां संबंधी अधिकृत माहिती मुख्य कार्यकारी अधिकारीच देतील. वरील माहिती कॅन्टोन्मेन्ट बोर्डाच्या वेबसाईट वर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

दिनांक: ११/०३/२०२०

मुख्य कार्यकारी अधिकारी
देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्ड